# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

बँक ऑफ इंडिया इमारत, 3 रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४००००१ ☎२२६७ 0210 /148 /248,22602222 फॅक्स : 22673915

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 ☎ 2267 0210 /148 /248, 22602222 Fax : 22673915

**ई-मेल** - sec_mpsc@maharashtra.gov.in **वेबसाईट** - www.mpsc.gov.in, www.mpsconline.gov.in


**सहायक आयुक्त (अन्न), सामान्य राज्य सेवा, गट - अ**

**धारिका क्रमांक : २१६१(२)/८०६३/दहा** **जाहिरात क्रमांक : १५३/२०११**

आयोगामार्फत **महाराष्ट्र शासनाच्या सहायक आयुक्त (अन्न), सामान्य राज्य सेवा, गट - अ** पदाच्या **एका** जागेसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी अर्हताप्राप्त असलेले उमेदवार अर्ज करू शकतात.

**२. उपलब्ध पदसंख्या :-**

| एकूण पदसंख्या | अमागास |
|---|---|
| १<br>अपंग | १<br>( अंध/अल्प दृष्टी ) |

**सदर पद अपंगासाठी ( अंध/अल्प दृष्टी ) आरक्षित आहे**

२.१ वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

३. **वेतनश्रेणी** : रु. १५६००- रू. ३९१००/- ग्रेड पे ५४००/- अधिक इतर भत्ते.

४. **पात्रता-४.१ वय- दिनांक १ जानेवारी, २०१२** रोजी खुल्या प्रवर्गाकरीता ४५ वर्षे. ४.२ महाराष्ट्र शासनाच्या कर्मचा-यांना उच्च वयोमर्यादा लागू नाही.

**४.२ शैक्षणिक अर्हता व अनुभव :-**

४.२.१ अधिनियमाच्या कलम २ च्या खंड (सात) मध्ये दिलेल्या अर्थानुसार स्थानिक क्षेत्रातील आरोग्य प्रशासनातील प्रभारी वैद्यकीय अधिकारी हे पद धारण केलेले असावे. (अन्नभेसळ प्रतिबंधक अधिनियम, १९५४ चा ३४ ), किंवा

४.२.२ औषध शास्त्रातील पदवी धारण केलेल्या आणि केंद्र शासनाने किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेल्या, अन्न निरीक्षण व नमुने घेण्याचे काम या विषयातील निदान एक महिन्याचे प्रशिक्षण घेतलेले असावे, किंवा

४.२.३ रसायनशास्त्र या विषयासह विज्ञान शाखेची पदवी घेतेलेल्या किंवा औषध निर्माण शास्त्र किंवा कृषी किंवा सार्वजनिक आरोग्य किंवा पशुवैद्यकशास्त्र किंवा अन्नतंत्र शास्त्र किंवा दुग्धतंत्र शास्त्र विषयातील पदवी किंवा दुग्धतंत्रशास्त्र किंवा अन्नतंत्र शास्त्र या विषयातील पदविका घेतलेल्या किंवा केंद्र शासनाने तत्सम म्हणून मान्यता दिलेली किंवा अधिसूचित केलेली अर्हता धारण करणा-या आणि अधिनियमाचे कलम २ याच्या खंड ३ (सहा) च्या अर्थानुसार अन्न (आरोग्य) प्राधिकरणाचे अन्न निरीक्षण आणि नमुने घेण्याचे काम याबाबतचे तीन महिन्याचे समाधानकारक प्रशिक्षण घेतलेले असावे आणि

४.२.४ अन्नाचे उत्पादन व त्याची चाचणी यामधील किंवा अधिनियमाची अंमलबजावणी यामधील किमान पाच वर्षाचा अनुभव असावा, आणि

४.२.५ मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक आहे.

४.२.६ ज्या उमेदवारांनी खंड(तीन) व खंड (चार) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही विषयातील स्नातकोत्तर पदवी धारण केलेली आहे, अशा उमेदवारांना पसंतीक्रम देण्यात येईल.

५. प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरीता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव याच्या आधारे निकष निश्चित करुन अथवा चाळणी परीक्षेद्वारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि / अथवा अनुभव शिथील केला जाणार नाही. चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येईल.

६. **कर्तव्ये व जबाबदा-या:-** प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-या याबाबतचा तपशील आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

७. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क,निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**" मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

८. **शुल्क** : (१) अमागास-४१०/- (२) मागासवर्गीय -२१०/- (३) सदर शुल्क ऑनलाईन अर्जांची नोंदणी केल्यावर प्राप्त होणा-या विहित चलनाद्वारे भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन वेळेत रोखीने भरावे लागेल. (४) बँकेमध्ये रक्कम भरल्यानंतर बँकेकडून चलनावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या Transaction ID ची नोंद पुन्हा ऑनलाईन पध्दतीने अचूकरित्या केल्याशिवाय अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होत नाही.

९. **अर्ज करण्याची पद्धत** :- (१) प्रस्तुत भरतीसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.(२)पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज www.mpsconline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक २२ सप्टेंबर, २०११ ते दिनांक १९ ऑक्टोबर, २०११** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.(३)ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याचे प्रात्यक्षिक (Demo) सदर वेबसाईटवर पाहता येईल.(४) विहित पद्धतीने दोन्ही टप्प्यांतील अर्ज सादर करण्याची (ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे व परीक्षा शुल्क बँकेत जमा केल्यानंतर Transaction ID नोंदविणे)

संपूर्ण कार्यवाही आयोगाने विहित केलेल्या कालावधीतच पूर्ण करणे आवश्यक आहे (५) बँकेमध्ये रकमेचा भरणा केल्यानंतर शासकीय कार्यालयीन कामकाजाच्या दोन दिवसानंतर विहित पध्दतीने Transaction ID अचूकपणे नोंदवावा. बँकेकडून प्राप्त झालेल्या Transaction ID ची नोंद अचूकपणे करण्यात आली असेल तरच पुढील प्रक्रिया करता येईल.

**१०**. विहित पद्धतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही **दिनांक १९ ऑक्टोबर**, **२०११ रोजी २३.५९ वाजेपर्यंत** पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल. तसेच चलनाद्वारे विहीत शुल्क बँकेमध्ये **दिनांक २० ऑक्टोबर**, **२०११** पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे आवश्यक राहील.

**११**. चलनाद्वारे शुल्क बॅकेमध्ये भरल्यानंतर बँकेकडून प्राप्त होणारा Transaction ID **दिनांक २४ ऑक्टोबर**, **२०११ रोजी २३.५९ वाजेपर्यंत** अचूकपणे नोंदविणे आवश्यक आहे त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

**१२**. आयोगाने विहित केलेल्या पध्दतीनुसार Transaction ID ची नोंद अचूकरित्या, विहित पध्दतीने व विहित कालावधीत न करणा-या उमेदवारांचा अर्ज स्वीकारला जाणार नाही.

**ठिकाण** : **मुंबई**
**दिनांक** : **२२ सप्टेंबर**, **२०११**

**प्र.ई.धबाले**
**उपसचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**